**मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष) प्रकल्पाच्या जलद व प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध समित्यांची पुनर्रचना व त्यांच्या कार्यकक्षांमध्ये सुधारणा समाविष्ट करणेबाबत व दक्ष प्रकल्पास "आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA)" मधून सूट देणेबाबत....**

# महाराष्ट्र शासन

## कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नाविन्यता विभाग

**शासन निर्णय क्रमांक : जाबॅप्र-२०२३/प्र.क्र.०६/व्यशि-४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० जुलै, २०२६.

**वाचा:-**

१. शासन निर्णय क्रमांक: जाबँप्र-२०२३/प्र.क्र.०६/व्यशि-४, दिनांक : १८ डिसेंबर, २०२३.
२. शासन निर्णय क्रमांक: जाबँप्र-२०२४/प्र.क्र.०२/व्यशि-४, दिनांक: २७ मे, २०२४.
३. शासन निर्णय क्रमांक: जाबँप्र-२०२४/प्र.क्र.०२/व्यशि-४, दिनांक: ०६ सप्टेंबर, २०२४.
४. शासन निर्णय क्रमांक: दक्षप्र-२०२४/प्र.क्र.२३/व्यशि-४, दिनांक: २९ मार्च, २०२५.
५. शासन निर्णय क्रमांक: जाबँप्र-२०२४/प्र.क्र.२०/व्यशि-४, दिनांक: ०६ जून, २०२५.
६. शासन निर्णय क्रमांक: दक्षप्र-२०२५/प्र.क्र.१५/व्यशि-४, दिनांक: १७ जुलै, २०२५.
७. दि.११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दक्ष राज्य सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

राज्यातील व्यावसायिक शिक्षण, नाविन्यता, रोजगार व कौशल्य प्रशिक्षणाच्या परिसंस्थेचा विकास करण्यासाठी जागतिक बँक सहाय्यित "मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास" (दक्ष) प्रकल्प राबविण्यास सं. क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. दक्ष प्रकल्प कालावधी पाच वर्षे असून प्रकल्पाची किंमत रु.२३०७.०० कोटी (जागतिक बँक कर्ज ७०% राज्य शासन ३०%) इतकी आहे. राज्यामध्ये दक्ष प्रकल्प दि.०५ फेब्रुवारी, २०२५ रोजी कार्यान्वित झालेला आहे.

२. कौ. रो. उ. व ना. विभागाने जागतिक बँकेच्या सहमतीने दक्ष प्रकल्पाचा "प्रकल्प मूल्यांकन दस्ताऐवज" (Project Appraisal Document) तयार केला असून प्रकल्पातील प्रस्तावित कर्ज वितरणासाठी "निधी वितरण निर्देशांक (Disbursement linked Indicators-DLIs)" पद्धत स्विकारलेली आहे. प्रकल्पाच्या कर्जाचे वितरण हे आर्थिक वर्षाच्या वित्तीय मर्यादेच्या पालनाऐवजी "निधी वितरण निर्देशांक" च्या पूर्ततेवर अवलंबून आहे.

३. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजीवणीसाठी सं. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समित्यांची पुर्नरचना व कार्यकक्षेमध्ये बदल करण्यास दक्ष प्रकल्प राज्य सुकाणू समितीच्या दि.११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर समित्यांची पुर्नरचना करुन त्यांच्या अधिकार व कार्यकक्षा सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दक्ष प्रकल्पाच्या राज्य सूकाणू समितीची (State Steering Committee) बैठक दि.११ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दक्ष प्रकल्पांतर्गत सं.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये गठीत समित्यांचे पुनर्गठन व त्यांच्या कार्यकक्षांमध्ये सुधारणा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर सुधारित समित्यांची संरचना, कार्ये/जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील:-

अ) **प्रकल्प अंमलबजावणी विभाग (Project Implementation Department / PID):-**

राज्य शासनातर्फे दक्ष प्रकल्प अंमलबजावणी विभाग म्हणून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग कार्यरत राहील.

| अ.क्र. | प्रकल्प अंमलबजावणी विभागाची (PID) कार्ये/जबाबदाऱ्या |
|---|---|
| ०१ | कौ. रो. उ. व ना. विभागाने जागतिक बँकेच्या सहमतीने बनविलेल्या प्रकल्प मूल्यांकन दस्ताऐवजानुसार (Project Appraisal Document) प्रकल्पाच्या उद्दिष्टांशी, परिणाम क्षेत्रांशी (Result Area- RA's) तसेच निधी वितरण निर्देशांकांशी (Disbursement Linked Indicators- DLI's), सुसंगत असलेले वार्षिक प्रस्ताव राज्य सुकाणू समितीकडे (SSC) सादर करणे व राज्य सुकाणू समितीने मान्य केलेल्या वार्षिक कृती आराखडयानुसार प्रकल्पाचे पर्यवेक्षण करणे, सल्ला देणे, अंमलबजावणी करुन घेणे. |

**ब) प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (Project Implementation Agency/PIA):-** विभागाच्या अधिपत्याखालील खालील कार्यालये "प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा" (PIA) म्हणून कार्य करतील.

१. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई.
२. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
३. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई.
४. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी,मुंबई.
५. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी,मुंबई.
६. महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिक्षा मंडळ,मुंबई.

| अ.क्र. | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणांची (PIA) कार्ये/जबाबदाऱ्या |
|---|---|
| ०१ | प्रकल्पांतर्गत त्यांचेशी संबंधित कामांचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करणे. |
| ०२ | प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या बैठकीच्या माध्यमातून कामाची / योजनेची द्विरुक्ती/ अतिव्याप्ती (Overlapping) होत नसल्याची खात्री करणे. |
| ०३ | राज्य सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये मंजूर झालेल्या वार्षिक कृती आराखडयास अनुसरुन प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव दक्ष प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत शासनास सादर करणे. |
| ०४ | प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांना तांत्रिक मंजुरी घेणे. |
| ०५ | प्रकल्प व्यवस्थापन कक्षास आवश्यक असलेली माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देणे. |
| ०६ | मान्य वार्षिक कृती आराखडयास अनुसरुन व प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांच्या अटी व |

| | |
|---|---|
| | शर्ती तयार करुन निविदा प्रक्रिया राबविणे, निविदेची छाननी करणे, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने कार्यादेश देणे, पर्यवेक्षण करणे, कामांची गुणवत्ता तपासणे, निधीचे विनिमयन करणे, खर्चाचे लेखे तयार करणे, त्रैमासिक व वार्षिक उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर करणे, लेखापरिक्षणामध्ये उपस्थित आक्षेपांची पूर्तता करणे, विधानमंडळ आयुधांद्वारे उपस्थित मुद्यांची पूर्तता करणे, जागतिक बँकेच्या नियमांचे पालन करणे. |
| ०७ | प्रकल्प समाप्तीनंतर सर्व यंत्रणा या त्यांचेशी प्रकल्पासंबंधित सर्व अनुषांगिक बाबी हाताळतील. |

क) **प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit /PMU):–**

आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी हे दक्ष प्रकल्पाचे पदसिद्ध संचालक म्हणून कार्यरत राहतील. सं.क्र. १ येथील शासन निर्णयामधील प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची संरचना खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

**प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU)**

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रकल्प संचालक (आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय,नवी मुंबई तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य सोसायटी,मुंबई) | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त प्रकल्प संचालक | सदस्य |
| ३ | कुलगुरु, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,मुंबई | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी,मुंबई | सदस्य |
| ५ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिक्षा मंडळ | सदस्य |
| ७ | संचालक / उपसंचालक महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा | सदस्य |
| ८ | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ९ | विधी अधिकारी (दक्ष) | सदस्य |
| १० | विशेष तज्ज्ञ सल्लागार (१) (नामनिर्देशित) | सदस्य |
| ११ | विशेष तज्ज्ञ सल्लागार (२) (नामनिर्देशित) | सदस्य |
| १२ | निमंत्रित विषय तज्ज्ञ | सदस्य |
| १३ | प्रकल्प उपसंचालक (दक्ष) | सदस्य सचिव |

| अ.क्र. | प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (PMU)कार्ये/जबाबदाऱ्या |
|---|---|
| ०१ | जागतिक बँक, कौ. रो. उ. व ना. विभाग, प्रकल्प समन्वय समिती (PCC), सर्व कार्यान्वयीन यंत्रणा, प्रकल्प सल्लागार, प्रकल्प अंमलबजावणी भागीदार यांच्यामध्ये समन्वय साधणे. |
| ०२ | "प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणांनी" (PIA) सादर केलेल्या वार्षिक कृती आराखड्याची छाननी करणे व सदर आराखडा हा जागतिक बँकेने ठरवून दिलेल्या कार्यक्रम मूल्यांकन दस्तावेज, (PAD) परिणाम क्षेत्रे, (Result Area) आणि निधी वितरण निर्देशांक (DLI) यांचेशी सुसंगत असल्याची खात्री करणे व छाननीअंती परिपूर्ण असलेले प्रस्ताव प्रकल्प समन्वय समितीच्या (PCC) परिक्षण व मान्यतेसाठी सादर करणे. |
| ०३ | प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यान्वयीन यंत्रणांना निर्देश देणे, त्यामध्ये समन्वय साधणे, तसेच कार्यान्वयीन भागीदार व भागीदारीचे व्यवस्थापन करणे. |

| | |
|---|---|
| ०४ | अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे, विशेषतः किंमत /मापदंड (Cost Norms) यावर निर्णय घेण्याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (PMC) राहील. |
| ०५ | दक्ष प्रकल्पांतर्गत एका कार्यान्वयीन यंत्रणांनी, कामासाठी स्पर्धात्मकरित्या मिळवलेले दर, सूचीबध्द केलेल्या तज्ज्ञ संस्था, तशाच प्रकारच्या कामासाठी इतर कार्यान्वयीन यंत्रणांसाठी वापरण्याची परवानगी देणे. |
| ०६ | प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेणे, व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS), निधी संवितरण निगडीत निर्देशकांची (DLI) पूर्तता करणे, तसेच निधी संवितरण निगडीत निर्देशकाच्या (DLI) संबंधात माहिती विहित वेळेत स्वतंत्र तपासणी संस्थेला (IVA) सादर करुन जागतिक बँकेसोबत वेळेत निधी वितरणासाठी समन्वय साधणे. |
| ०७ | प्रकल्पांच्या अनुषंगाने कार्यक्रमाचे कृती बिंदू (PAP), कायदेशीर करार, लेखापरिक्षणाचे अहवाल आणि अपेक्षित गुणवत्ता मानके यांची पूर्तता प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेकडून (PIAs) होत असल्याची खातरजमा करणे. |
| ०८ | भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (CAG) यांच्यामार्फत होणारे लेखापरिक्षण तसेच अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) हे वित्तीय नियम अधिकार पुस्तिकेनुसार होत असल्याची खात्री करणे. |
| ०९ | नाविन्यपूर्ण संकल्पना/ज्ञानाच्या भागीदारी (Knowledge Partnerships)/तज्ज्ञ संस्था (Domain Experts) यांच्या थेट निवड आधारित विशेष प्रकल्पांची शिफारस प्रकल्प समन्वय समितीस करणे. |
| १० | प्रकल्पांतर्गत विस्तृत प्रस्ताव (Detail Project Report- DPR), खरेदी करार, खरेदी, निविदा, मानके इ. बाबी तपासून त्या बरोबर असल्याची खात्री करणे. |
| ११ | प्रकल्प समन्वय समिती व राज्य सुकाणू समिती यांनी निर्देशित केलेली कामे करणे. |

**ड) प्रकल्प समन्वय समिती (Project Coordination Committee / PCC):–** प्रत्येक वर्षी प्रकल्पाचा अंतिम वार्षिक कृती आराखडा राज्य प्रकल्प समन्वय समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यासाठी प्रकल्प समन्वय समितीची (PCC) संरचना खालीप्रमाणे राहील.

**प्रकल्प समन्वय समिती (PCC)**

| अ.क्र. | समितीचे सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | अ.मु.स./ प्र.स./ सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | अध्यक्ष |
| २ | प्रकल्प संचालक (आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय,नवी मुंबई तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य सोसायटी,मुंबई) | सदस्य |
| ३ | कुलगुरु, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,मुंबई | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी | सदस्य |
| ५ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, म. रा. कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिक्षा मंडळ | सदस्य |
| ७ | संचालक, उद्योग संचालनालय (उद्योग विभाग) | सदस्य |
| ८ | सहसचिव /उपसचिव (वित्त विभाग), अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | औद्योगिक आस्थापनांच्या अग्रणी संस्थाचा प्रतिनिधी (CII, FICCI, ASSOCHAM) | सदस्य |
| १० | सहसचिव/ उपसचिव (अर्थसं.), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | सदस्य |
| ११ | सहसचिव / उपसचिव / वि.का.अ. (दक्ष), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग. | सदस्य |
| १२ | तज्ज्ञ सल्लागार (नामनिर्देशित) | सदस्य |
| १३ | अतिरिक्त प्रकल्प संचालक (दक्ष) | सदस्य सचिव |

| अ.क्र | प्रकल्प समन्वय समितीची (PCC) कार्ये/जबाबदाऱ्या |
|---|---|
| ०१ | प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून एकत्रित केलेला वार्षिक कृती आराखडा सादर करण्यापूर्वी त्याची परिणाम क्षेत्रे (Result Area), निधी संवितरणाशी निगडीत निर्देशांक (DLIs), प्रकल्पाच्या बंधनकारक बाबी, राज्याची प्राथमिकता यांच्याशी सुसंगत असल्याची खात्री करून राज्य सुकाणू समितीस मान्यतेसाठी सादर करणे. |
| ०२ | नाविन्यपूर्ण संकल्पना/ज्ञानाच्या भागीदारी (knowledge partnerships) /तज्ज्ञ संस्था (Domain Experts) यांच्या थेट निवड आधारित विशेष प्रकल्पांना मान्यता देणे. |
| ०३ | जागतिक बँकेकडून प्राप्त निधीच्या प्रमाणात राज्याचा हिस्सा, विहित वेळेत मंजूर होऊन वितरीत होत असल्याची खात्री प्रकल्प समन्वय समितीने करणे. |
| ०४ | प्रकल्प समन्वय समितीला (PCC) सादर झालेल्या प्रकल्पामध्ये आवश्यकतेनुसार बदल करणे, सुधारणा करणे, कामांचा अग्रक्रम बदलणे. |
| ०५ | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या (PIA) कामांचा आढावा घेणे, निधीची मागणी करणे, निधी खर्च होत असल्याची उपयोगिता प्रमाणपत्रे (UC) सादर करत असल्याची खात्री करणे. |
| ०६ | संवितरण निगडीत निर्देशांकाबाबत (DLI) स्वंतत्र तपासणी संस्थेमार्फत (IVA) उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांना आदेश देणे. |
| ०७ | प्रकल्पासंबंधित घटकांचा धोरणात्मक सहभाग वाढविण्यासाठी सुधारणा, क्षमता उभारणी व व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणे. |
| ०८ | जोखिम व्यवस्थापन, तक्रार निवारण, पर्यावरण आणि सामाजिक संरक्षण, संस्थात्मक सुधारणा या संबंधातील धोरणांना मान्यता प्रदान करणे. |
| ०९ | प्रकल्प समन्वय समिती विशेषज्ज्ञ किंवा विभागांतर्गत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्यावेळी प्रकल्पाच्या कामासाठी निमंत्रित करु शकेल. |
| १० | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांच्यावर देखरेख करणे, प्रकल्पाची परिणाम क्षेत्रे (RA), संवितरण निगडीत निर्देशांक पूर्तता (DLI) व महत्वाचे टप्पे विहित वेळेत पूर्ण होत असल्याची खात्री करणे. |
| ११ | प्रकल्पाच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी प्रकल्प समन्वय समितीला तज्ज्ञ व्यक्ती / सल्लागारांची समिती स्थापन करण्याचे अधिकार असतील. |
| १२ | राज्य सुकाणू समितीने निर्देशित केलेली कामे पूर्ण करणे. |

इ) **राज्य सुकाणू समिती (State Steering Committee):-** दक्ष प्रकल्पाच्या वार्षिक कृती आराखडयास अंतिम मान्यता देण्यासाठी व प्रकल्पाच्या मार्गदर्शनासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सुकाणू समितीची (SSC) संरचना खालीलप्रमाणे राहील.

**राज्य सुकाणू समिती (SSC)**

| अ.क्र. | समितीचे सदस्याचे नाव | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य. | अध्यक्ष |
| २ | अ.मु.स./प्र.स./सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई . | सदस्य |
| ३ | अ.मु.स./प्र.स./सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ४ | अ.मु.स./प्र.स./सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ५ | अ.मु.स./प्र.स./सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | अ.मु.स./प्र.स./सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग, मंत्रालय,मुंबई. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७ | अ.मु.स./प्र.स./सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई. | सदस्य |
| ८ | अ.मु.स./प्र.स./सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई. | सदस्य |
| ९ | प्रकल्प संचालक-दक्ष तथा आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई | सदस्य सचिव |

राज्य सुकाणू समिती तज्ज्ञ व्यक्तींना आवश्यकतेनुसार निमंत्रित करू शकेल.

| अ.क्र. | राज्य सूकाणू समितीची (SSC) कार्ये |
|---|---|
| ०१ | राज्य समन्वय समितीने सादर केलेल्या दक्ष प्रकल्पाच्या वार्षिक आराखडयास मान्यता देणे. |
| ०२ | प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेली कामे राज्याच्या विकासात्मक धोरणानुसार असल्याची खात्री करणे. |
| ०३ | प्रकल्प मूल्यांकन दस्तावेज (PAD), वार्षिक कामे व खर्चाच्या नियोजनाचा आढावा घेणे. |
| ०४ | आंतरविभागीय समन्वय आणि विशेष प्रकल्पांवर देखरेख ठेवणे. |

२. विभागाच्या दि.१८ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये (PMU) दक्ष प्रकल्प कालावधीकरिता अस्थायी पदे निर्माण करण्यास तसेच आवश्यक त्या कालावधीकरिता बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पद्धतीने आवश्यक ती पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर पदांवर भरण्यात आलेल्या मनुष्यबळाचे भत्ते व इतर प्रशासकीय खर्च करण्यास दक्ष प्रकल्पाच्या निधीतून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. दक्ष प्रकल्पास “आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA)” मधून वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.८२/२०२६/को.प्र.५ नुसार दिनांक ०५ मे, २०२६ रोजी दिलेल्या सहमतीस अनुसरुन सूट देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७१०१४१९३३८५०३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.07.10 14:22:17 +05'30'

**( वैशाली सुळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास)/ मा. उपमुख्यमंत्री (राउशु) यांचे प्रधान सचिव, मुंबई,
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई,
७) सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
८) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
९) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,

१०) प्रकल्प संचालक तथा आयुक्त, कौ.वि.रो. व उ. संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,

११) कुलगुरु, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई.

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई,

१३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१४) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई,

१५) संचालक, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई,

१६) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई /पुणे /नाशिक /अमरावती / छ. संभाजीनगर /नागपूर.

१७) उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय मुख्यालय मुंबई /पुणे /नाशिक / छ. संभाजीनगर /अमरावती /नागपूर.

१८) सर्व सहसचिव/ उपसचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई,

१९) महालेखापाल, लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,

२०) महालेखापाल, लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,

२१) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,

२२) निवासी लेखापरिक्षण अधिकारी, मुंबई,

२३) निवडनस्ती / व्यशि-४.